# राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

## तक्रार क्रमांक : ८१२/२०२१

**तक्रारकर्ता, श्री.रामनारायण चौरसिया**
१०१, एकदंत अपार्टमेंट,
विजय नगर, नालासोपारा पूर्व,
ता.वसई, जि.पालघर ४०१ २०९.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,
तहसिल कार्यालय वसई (महसूल),किल्ला बंदर रोड,
मालोंडे, वसई गाव, ता.वसई, जि.पालघर ४०१ २०१.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,
तहसिल कार्यालय वसई (महसूल), किल्ला बंदर रोड,
मालोंडे, वसई गाव,ता.वसई, जि.पालघर ४०१ २०१.

**द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २९.०५.२०२४**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०२.२०२० | -- | ०३.०९.२०२० | १४.१०.२०२० |

तक्रारकर्ता यांनी दि. १२.०५.२०२१ रोजीच्या अर्जान्वये *" प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर असमाधानकारक माहिती मिळाली आहे. "*असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक २९.०५.२०२४ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस तक्रारकर्ता व प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस प्राप्त झालेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत) .

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

- *"Letter despatched dated on १९/०७/२०१९ having subject matter as to status for Fer Faar in the caption of Description of information required.*

*Provide me the copy of correspondences doneand /or received in connection to the above mentioned subject matter by your department, after inspection if copies required to be furnished under R.T.I.Act २००५."*

सदर प्रकरणात वस्तुस्थिती अशी आहे की, तक्रारकर्ता यांनी दि.२४.०२.२०२० रोजीच्या माहिती अर्जान्वये मागीतलेली माहिती न मिळाल्यामुळे, प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपिल दाखल केले आहे. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन, दि.१४.१०.२०२० रोजी “जन माहिती अधिकारी, अ.का., तहसिलदार कार्यालय, वसई यांनी या कार्यालयाकडे विषयांकित उपलब्ध माहिती अपिलकर्त्यास १५ दिवसात विनामुल्य पुरवावी.” असे आदेश पारित केल आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर सुध्दा जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती पुरविली नाही.

यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द माहिती अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे. तसेच, आता विद्यमान जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य होईल. सदर प्रकरणी पुन्हा सुनावणी घेण्यात येईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

**आदेश**

१. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय वसई (महसूल) यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक २४.०२.२०२० रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपिलीय प्राधिकारी यांच्या आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रत्येक दिवसासाठी रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी दि.०५.०८.२०२४ रोजीच्या सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दिनांक ०५.०८.२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता घेण्यात येईल.

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २९ मे, २०२४ .

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, तहसिल कार्यालय वसई (महसूल), किल्ला बंदर रोड, मालोंडे, वसई गाव,ता.वसई, जि.पालघर ४०१ २०१.

**- यांना प्रत**

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून,
तहसिल कार्यालय वसई (महसूल), किल्ला बंदर रोड,
मालोंडे, वसई गाव,ता.वसई, जि.पालघर ४०१ २०१.

**यांचेमार्फत रवाना.**